# करुनी जावे बरेच काही या दुनियेतून जाताना.....

आपल्याला मिळालेली सर्वात सुंदर गोष्ट म्हणजे जीवन |
ज्यात मनुष्य जन्म घेऊन आपण होतो पवन ||
आईवडिलांनी पाहिलेल्या स्वप्नाचा डोंगर पाठीशी असतो या धरणीवर जन्म घेताना,
भाऊ-बहिणीच्या मैत्रीची ओढं असते, जीवनाची सुरुवात करताना
आजी-आजोबांच्या प्रेमाची गोष्टच न्यारी असते ही जीवन जगताना
अनेक कर्तव्य आपलीही असतात या कुटुंबाला जोपासताना
आपणही नाही हटावे मागे आपले कर्तव्य पर पडताना |
करुनी जावे बरेच काही या दुनियेतून जाताना ||

आई वडील आपल्यासाठी राब राब राबतात
दु:खाचा डोंगर जारी कोसळला तरी आपल्या पायाखाली झाकतात
वडील आपले नोकरीवरचे सर्व टेंशन हास्यमय मुखवट्याखाली लपवतात
सर्व काही बाजूला सारून आपल्या कुटुंबाला मात्र आनंदाने जोपासतात
आई घरातील सर्व अडचणी मायेच्या पदाराखली पांघरते
मुलांबाळ्याच्या चेहऱ्यावर आनंद बघून सर्व दुनियेचे भान मात्र विसारते
मग आपल्याही मुखावर असावे मोठे हास्य अशा आई-वडिलांची सेवा करताना
त्यांचे ऋण मात्र नक्की फेडावे या जगाचा निरोप घेताना
करुनी जावे बरेच काही या दुनियेतून जाताना ||

मुलाच्या शिक्षणासाठी कर्ज काढताना त्यांचे हात नाही कापत
मुलीच्या लग्नात आपले कर्तव्य पार पडताना कधी मागे नाही ते हटत
दिवाळीला सर्वांना कपडे घेतील एवढेच नाही तर घरालाही सजवतील
पण स्वत मात्र मागच्या सणाचेच कपडे वापरतील
घरातील भाकरी संपल्यावर मला भूक नाही असे ती म्हणते
सर्वांच्या मुखावर आनंद पाहून स्वत:चे पोट ती भरते
मग आपणही का हटवे मागे त्यांना म्हतारपणात साथ देताना
त्यांच्या म्हतारपणाची काठी नक्की बनून जावे या जगाचा निरोप घेताना
करुनी जावे बरेच काही या दुनियेतून जाताना ||

बहिणीसारखि मैत्रीण या दुनियेत कुणी नसते
आपल्या सर्व गुपीतांची चावी जणू ती असते
भावासारखा सखा या दुनियेत शोधूनही नाही मिळत
दीदी-दीदी म्हणत स्व:ताची गोष्ट काशी पटवतो तेच नाही कळत
कधी नाही तुटणार ही प्रेमळ नाते राहील ते अतूट
भविष्यात एकेदिवशी आई-वडिलांची मन नक्की उचवेल ही त्रिकुट
अनेक भंडानेही होतात भावा-बहिणीचे ही नाते जपताना
सर्व भांडणे बाजूला सारून यशाची वाट नक्की डाखून जावे, या जगाचा  निरोप घेताना
करुनी जावे बरेच काही या दुनियेतून जाताना ||

घरात अजून एक महत्त्वाचे अन मनाची स्थान असते
जे फक्त आणि फक्त आपल्या आजी-आजोबांना मिळते
रात्री झोप येत नाही तेव्हा अंगाईगीत ती म्हणते
रामायण-महाभारताच्या गोष्टी सांगून पुरातत्वाचे दर्शन घरीच घडवते
‘काहीतरी खावस वाटतय’, अस सांगितल की गुपचुप पैसे कडून देतात
बाजाराला घेलयावर खाऊ मात्र आठवणीने आणतात
असे खट्याळ आजी-आजोबा मोजक्यात घरात दिसतात हसताना
आपण मात्र नातवंडांचे कर्तव्य पार पाडून जावे या जगाचा निरोप घेताना
करुनी जावे बरेच काही या दुनियेतून जाताना ||

कुटुंब म्हणजे एक विशाल असा सागर जणू
या विशाल संगरातील पानी आपण बनू
ज्यावर संगरातील सर्व घटकांचे अस्तित्व अवलंबून असते
मात्र पानी आटले की त्यांच्या जीवनाचे मूल्यच शून्य बनते
आईवडील आपल्यात भविष्याची प्रतिमा पाहतात
आपयावर विश्वास ठेवून आपले जीवन आनंदाने जगतात
या सर्वांसाठी जीवनाचा आधार नक्की बनावे या जगाचा निरोप घेताना
करुनी जावे बरेच काही या दुनियेतून जाताना ||
या दूनियेतून जाताना........

- हर्षदा प्रकाश बोरसे